लाखों वाचकांचे व्यासपीठ, कॅलिफोर्निया टाईम्स, डिजीटल एडीशन

सांध्य दैनिक
# कॅलिफोर्निया टाईम्स

Mob. 7020725344, 9422159769
E_mail : caltimes_daily@ rediffmail.com
E_mail :dailycaliforniyatimes@ gmail.com
www.facebool/giridhardeshmukh7

मुख्य संपादक-गिरिधर भि.देशमुख

www.Californiatimes.co.in

वर्ष २२ | अंक ५७ | शुक्रवार दिनांक १८ ऑक्टोंबर २०२४ | किंमत २ रुपये | पृष्ठ ६




# मोर्शी विधानसभा मतदारसंघाचा राग रंग

## महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी पक्ष (शरद पवार गट)चे तिकीट मिळवण्याकरता अनेक इच्छुक

### राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांचे नाव जवळजवळ निश्चित



**मोर्शी :कॅलिफोर्निया टाईम्स अंबादास सिनकर-** महाराष्ट्र राज्याच्या 14 व्या विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू असून प्रशासन व राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. प्रशासनातर्फे मतदार यादी अध्यावत करण्यापासून काम सुरू आहे तर राजकीय पक्ष आपापले उमेदवार शोधण्यात व्यस्त दिसून येत आहे राजकीय पक्षाचे तिकीट मिळवण्यासाठी निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार आटोकाट प्रयत्न करीत आहेत. या निवडणुकीत दोन मुख्य आघाड्या दिसत असून त्यामध्ये महायुती व महाविकास आघाडी यांनी आपले उमेदवार जवळपास निश्चित केल्यासारखे आहे. त्यामध्ये महायुतीने मोर्शी विधानसभा मतदारसंघ आपल्या घटक पक्ष राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या करीता सोडला आहे तर महाविकास आघाडीने आपला घटक पक्ष राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्याकरिता सोडला आहे. तसेच बहुजन वंचित आघाडीची तिकीट प्राचार्य रमेश ढोरे यांना पक्की झाली आहे ते सुद्धा आपल्या परीने प्रयत्न करीत आहेत

वरुड मध्ये मोठा महिला मेळावा घेऊन अजित पवार यांनी विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांचे नाव जवळजवळ निश्चित केले आहे. तरीही राज्यसभेचे खासदार आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष अनिल बोंडे भाजपाच्या सौ अर्चना मुरूमकर यांना मोर्शी मतदारसंघात पुढे करीत आहेत. भाजपाचे मतदार संघ प्रभारी अमित कुबडे हे सुद्धा मी रिंगणात असेलच असे सांगत आहे. त्यामुळे महायुती मध्ये बंडखोरी होणार हे निश्चित आहे.

तसेच महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी पक्ष (शरद पवार गट)चे तिकीट मिळवण्याकरता अनेक इच्छुक उमेदवारांनी आपापले पक्ष सोडून शरद पवारांकडे तिकीट मिळवीण्याकरता मागणी केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रवादीचेच निष्ठावंत मोहन मडघे, डॉ.प्रदीप कुऱ्हाडे, काँग्रेसचे गिरीश कराळे, काँग्रेसचेच विक्रम ठाकरे, भाजप सोडुन आलेले डॉ. मनोहर आंडे, उमेश यावलकर इत्यादींचा समावेश आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटात, मोर्शीचे तिकीट विक्रम ठाकरे यांना देण्यात यावे अशी पक्षातील काही ज्येष्ठ नेते एनसीपी (श प )पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि खासदार अमर काळे मागणी आहे तर यापुढे पक्षाच्या भवितव्यासाठी जातीय समीकरण पाहून तिकीट डॉ मनोहर आंडे यांना दिले जावे असे या जिल्ह्यातील पक्षाचे शिर्षस्त नेतृत्व हर्षवर्धन देशमुख यांना वाटते. परंतु पक्षाने कुणालाही तिकीट दिले तरी आम्ही त्याचे प्रामाणिकपणे काम करू असे हर्षवर्धन देशमुख यांचे म्हणणे आहे.

1962 पासून झालेल्या 13 निवडणुकांमध्ये आतापर्यंत सात वेळा काँग्रेसचा विजय झालेला आहे तर तीन वेळा अपक्षांनी बाजी मारलेली आहे. 2004 मध्ये जनस्वराज संस्था, 2014 मध्ये भारतीय जनता पक्ष आणि 2019 मध्ये स्वाभिमानी पक्ष यांनी विजय मिळवला आहे. या मतदारसंघात हर्षवर्धन देशमुख यांनी 1990 मध्ये, 1995 मध्ये आणि 2004 मध्ये असे तीन वेळा प्रतिनिधित्व केलेले आहे. तर डॉ अनिल बोंडे यांनी 2009 आणि 2014 मध्ये प्रतिनिधित्व केलेले आहे. तसा हा मतदार संघ काँग्रेसचा बालेकिल्ला समजायला काही हरकत नाही कारण येथून सात वेळा काँग्रेसचे आमदार निवडून गेलेले आहेत.

निवडणुकीमध्ये महायुतीचे देवेंद्र भुयार तर महाविकास आघाडीचे विक्रम ठाकरे किंवा डॉ. मनोहर आंडे, भाजपाच्या बंडखोर म्हणून सौ अर्चना मुरूमकर, अमित कुबडे, श्रीधर सोलव, राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) निष्ठावंत म्हणून ओळखले जाणारे मोर्शी नगरपरिषदेचे माजी उपाध्यक्ष मोहन भाऊ मडघे सुद्धा हर्षवर्धन देशमुख यांना तिकीट मिळाले नाही तर उभे राहण्याची शक्यता आहे.शिवसेना (शिंदे) गटाचे अमोल भुयार, प्रहार चे डॉक्टर महेंद्र राऊत, हे सुद्धा आपला जनसंपर्क दौरा करीत आहेत. वाढत्या वयामुळे मी लोकसभा किंवा विधानसभा कोणतीही निवडणूक लढविण्यास इच्छुक नसल्याचे हर्षवर्धन देशमुख यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे निवडणूक अटीतटीची होणार आहे. बघूया कोण कोण इच्छुक रिंगणात आहेत.

### भाजपाचं टेंशन वाढवणारी बातमी!

# पवारांचा पुढचा डाव मुंबईत?

## बडा नेता गळाला लागणार?




**मुबइ :स्टाफ-** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकाच्या पार्श्वभूमावर आचारसंहिता लागू झाल्याने राज्यातील राजकीय वातावरण तापलेले आहे. याच पार्श्वभूमीवर, विविध नेते आणि आमदारांची पक्षांतराची मालिका सुरू असून आणखी अनेक पक्षप्रवेश होणार असल्याची चर्चा सुरु आहे. अशातच या चर्चेत आता नवी मुंबईतील ज्येष्ठ नेते आणि भाजप आमदार गणेश नाईक यांच्या नावाची भर पडली आहे. नाईक यांनी भाजपला रामराम करण्याचा निर्णय घेतलाच तर ते कोणाच्या गळाला लागणार याबाबतही विविध कयास बांधले जात आहेत.गणेश नाईक यांचा नवी मुंबईतील ऐरोली आणि बेलापूर मतदारसंघावर चांगलाच होल्ड आहे. मात्र, भाजपमध्ये त्यांना अपेक्षित न वेटेज मिळालं नसून, त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांना राजकीय संधी देण्यात आलेली नाही. 2019 च्या विधानसभा निवडणुकीनंतर गणेश नाईक यांना मंत्रिपदाची संधीही दिली गेली नाही, यामुळेच नाईक कुटुंब भाजपवर नाराज असल्याचे समजते. याशिवाय, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीसाठी इच्छूक असलेल्या संजीव नाईक यांना भाजपकडून उमेदवारी न मिळाल्याने, नाराजीचा सूर अधिकच तीव्र झाला आहे.यामुळेच, पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते असलेले गणेश नाईक, पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस किंवा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यासोबत जाण्याची शक्यता वर्तवण्यात आहे.

### मतदानासाठी मतदार यादीत नाव आवश्यक नाव नोंदणी करण्यासाठी 19 ऑक्टोबर पर्यंत अंतिम मुदत– मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम

**मुंबई, दि. 17 :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सन 2024 चा कार्यक्रम जाहीर झाला असून दि. 20 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील एकूण 288 विधानसभा मतदारसंघात एकाच टप्प्यात मतदान घेणार आहे. या निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट असणे आवश्यक आहे, ज्यांनी आपले नाव मतदार यादीत अद्याप समाविष्ट केलेले नाही त्यांना अजूनही दि. 19 ऑक्टोबर 2024 पर्यंत मतदार यादीत आपले नाव नोंदवण्याची संधी आहे, तरी आपले नाव आर्वजून मतदार यादीत समाविष्ट झाले असल्याची खात्री प्रत्येक मतदाराने करावी. तसेच ज्यांनी अजून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट केले नाही त्यांनी तातडीने 19 ऑक्टोबरच्या आत आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, जेणेकरुन मतदानाच्या दिवशी मतदानाचा आपला हक्क मतदारांना बजावता येईल, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी केले.

अजूनही ज्यांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवलेले नाही त्यांना दि. 19 ऑक्टोबर रोजी रात्री पर्यंत ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने मतदार यादीत नाव नोंदणी करण्याची संधी उपलब्ध असून निरंतर मतदार नोंदणीचा कार्यक्रम अद्याप सुरु आहे. त्यामुळे ज्या पात्र नागरिकांची आतापर्यंत मतदार नोंदणी झालेली नाही, अशा नागरिकांकडून उमेदवारांचे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या 10 दिवस अगोदरपर्यंत म्हणजेच दि. 19.10.2024 पर्यंत प्राप्त झालेले अर्ज क्र. 6 मतदार यादीमध्ये नोंद घेण्यासाठी विचारात घेण्यात येतील. तरी या संधीचा लाभ घेऊन सर्व पात्र नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करत मतदानाचा आपला हक्क आर्वजून बजावावा, तसेच सर्व मतदारांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट असल्याची खात्री तातडीने करुन घ्यावी, असे आवाहन श्री.चोक्कलिंगम यांनी केले आहे.






## संपादकीय...

# साता उत्तरांची नवी कहाणी

दिवंगत समाजवादी विचारवंत आणि दीर्घकाळ विधान परिषदेचे सदस्य राहिलेले नेते ग. प्र. प्रधान यांनी एकेकाळी महाराष्ट्राला 'साता उत्तरांची कहाणी' सांगितली होती. या रोचक ललित–वैचारिक कादंबरीत स्वातंर्त्यपूर्व काळात समाजवादी, साम्यवादी, रॉयवादी, पत्री सरकार म्हणजे मराठी मातीतला सशस्त्र प्रतिकार, आंबेडकरवादी, हिंदुत्ववादी आणि गांधीवादी या सात प्रकारचे वैचारिक प्रवाह होते. त्यांचे संवाद आणि संघर्ष होते. ही कादंबरी गाजली.

'प्रधान मास्तर' पुढे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेही झाले. प्रधानांनी ज्या सभागृहाची मान व थोरवी उंचावली; त्या सभागृहातल्या राजकीय पेचावर महायुती सरकारने 'नवी साता उत्तरांची कहाणी' लिहून ती तातडीने अमलातही आणली आहे. राज्यपालांकरवी नियुक्त करून घेतलेले तीन सत्ताधारी पक्षांचे सात आमदार हे ते उत्तर आहे. तरीही, महायुतीने पाच उत्तरे शोधायची बाकी ठेवलीच आहेत. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार असताना विधान परिषदेत रिक्त असणाऱ्या 1 2 जागांवर राज्यपालांनी आमदारांची नेमणूक करावी; यासाठी तेव्हाचे सत्ताधारी जंग जंग पछाडत होते.तेव्हा बोलताना कमी विचार करणारे, पण कृती मात्र विचारपूर्वक करणारे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शेवटपर्यंत या नेमणुकांबाबत आपली 'विचाराधीन भावावस्था' सोडली नाही. ठाकरे यांचे गाफील सरकार कोसळले, तेव्हा ती आधीची शिफारशींची फाइलही रद्दी रूपास पावली. आता हे सरकार येऊनही कमी काळ झाला नाही. तेव्हाची दिरंगाई राजभवनात झाली; आताची सत्तेच्या 'बर्म्युडा ट्रँगल'मध्ये. इतके होऊनही सातच आमदारांच्या नेमणुका व्हाव्यात आणि पाच जागा रिकाम्या राहाव्यात, यावरून हा युतीतली रस्सीखेच आणि दुसरीकडे, सर्व इच्छुकांसाठी गाजरखेळ असा हा दुहेरी मामला बनलेला दिसतो.हे प्रकरण मागेच उच्च न्यायालयात गेले आहे. आता या नव्या नेमणुका झाल्यानंतर या प्रक्रियेला स्थगिती देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. मागे या प्रकरणी न्यायालयांमध्ये सुनावणी झाली तेव्हा 'नेमक्या किती मुदतीत राज्यपालांनी आमदारांच्या नेमणुका कराव्यात, यासाठी कोणतीही स्पष्ट किंवा कालमर्यादा घालून देणारी तरतूद राज्यघटनेत नाही...' असे स्पष्ट झाले होते. मुख्य म्हणजे, राज्यपालांनी नेमणूक करण्याच्या या 1 2 जागा विद्वान, विचारवंत, कलावंत, साहित्यिक आदींसाठी राखून ठेवाव्यात, असा संकेत आहे. तो संकेत पाळून विद्यमान सरकारने तीन सत्ताधारी पक्षांतील सात 'विचारवंत व विद्वान' आता शोधून काढले आहेत! मात्र, उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस यांच्या सरकारलाही राज्यातील विद्वत्तेचा आणि प्रतिभेचा लवकरात लवकर उचित गौरव करण्याची मोठी तहान लागली होती, असे बिलकुलच नाही. त्या सरकारलाही या 1 2 जागांचे राजकारणच करायचे होते. तसे नसते तर आपले सरकार गेल्यानंतर 'लेखक व कलावंतांचा गौरव करण्यासाठी या 1 2 जागा लवकरात लवकर भरा...' असा लकडा त्यांनी नव्या सरकारकडे व नव्या राज्यपालांकडे लावला असता.

# महात्मा फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची तायक्वांडो स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर गगन भरारी

**वरुड:कॅलिफोर्निया टाईम्स**–संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती( क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग पुरस्कृत) आंतर महाविद्यालयीन तायक्वांडो मुले व मुलींच्या 2024–25 च्या स्पर्धेचे आयोजन श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड जि.अमरावती येथे दि. 07 ते 09 ऑक्टोंबर 2024 रोजी केले होते. यामध्ये विविध वजन गटातून पहिल्या येणाऱ्या आठ मुली व आठ मुले यांची राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड झाली. यापैकी महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड सारख्या ग्रामीण भागातील मुले व मुलींनी तायक्वांदो सारख्या खेळात गगन भरारी घेऊन महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकवले आहे. यामध्ये चि.किशोर मिश्रा (क्स्न्ड्ड),चि.हमेश परतेती (क्स्ड्ड), अंजली नागले(क्स्न्ड्ड) हे विद्यार्थी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे प्रतिनिधी म्हणून अमृतसर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील तायकांडो स्पर्धेचे नेतृत्व करतील.




त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठामार्फत तायक्वांदो निवड समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रमोद हुंबाड (अध्यक्ष, तायक्वांडो निवड समिती, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ), सदस्य प्रा.सौरभ माकडे, प्रा. विराट घुडे, प्रा. बलवंत बोबडे, प्रा. गौरव सरवटकर, प्रा. डॉ. प्रशांत चर्जन व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांच्या हस्ते प्रथम येणाऱ्या तीन क्रमांक पटकावणाऱ्या श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती (प्रथम क्रमांक), महात्मा फुले महाविद्यालय वरूड (द्वितीय क्रमांक), गुलाब नबी आझाद महाविद्यालय बार्शी टाकळी (तृतीय क्रमांक),महाविद्यालयास चषक देऊन गौरविण्यात आले. तर मुलांना गोल्ड, सिल्व्हर आणि ब्रांझ पदके देऊन कौतुक केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी खूप शुभेच्छा देऊन पुढील यशासाठी प्रेरणा दिली.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठीमा.श्री. लोकेशजी अग्रवाल (अध्यक्ष, तायक्वांडो असोसिएशन, वरूड), आयोजक डॉ. संजय वि. सातपुते समन्वयक ढ्ढक्ष्ट, श्री. निलेश ठाकरे यांनी परिश्रम घेतले. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हरभरा , गहू , सूर्यफुलासह 6 पिकांच्या हमीभावात घसघशीत वाढ

## खासदार डॉ अनिल बोंडे यांनी मानले मोदी सरकारचे आभार

**अमरावती:कॅलिफोर्निया टाईम्स**–शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकत मोदी सरकारने 2025–26 हंगामासाठी रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत घसघशीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. रेपसीड, मोहरी,मसूर, हरभरा, गहू,सूर्यफूल आणि बार्ली या पिकांच्या 'एमएसपी' मध्ये वाढ करण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. शेतकरी हिताच्या या निर्णयाबद्दल भारतीय जनता पार्टीचे अमरावती चे



जिल्हाध्यक्ष व राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे यांनी मोदी सरकारचे आभार मानले आहेत.

डॉ बोंडे यांनी पत्रकात म्हटले आहे की , केंद्र सरकारने 2025–26 हंगामासाठी रब्बी पिकांचे हमीभाव नुकतेच घोषित केले आहेत. यामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत रेपसीड आणि मोहरीच्या एमएसपी मध्ये 300 रु. तर मसूरच्या एमएसपी मध्ये 275 रु. प्रति क्विंटल अशी घसघशीत वाढ करून शेतक–यांना दिलासा दिला आहे. त्याचप्रमाणे हरभरा पिकाच्या एमएसपी मध्ये 210, गहू 150, सूर्यफूल 140 आणि बार्ली पिकाच्या एमएसपी मध्ये 130 रु. प्रति क्विंटल वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पिकांच्या सरासरी उत्पादन खर्चाच्या किमान 1.5 पट पातळीवर एमएसपी निश्चित करण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाला अनुसरून या 6 पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य भाव देऊन त्यांची आर्थिक स्थिती मजबूत करण्याच्या उद्देशाने घेतलेला हा महत्त्वपूर्ण निर्णय , केंद्रातील एनडीए सरकारची शेतक–यांप्रति असलेली कटीबद्धता दर्शवते असेही डॉ अनिल बोंडे यांनी पत्रकात नमूद केले आहे.

# डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्याची व्याप्ती!

## (18 ऑक्टोबर– डिप्रेस्ड क्लास मिशन स्थापना दिन/दिवस.)

*महाराष्ट्रात अनेक समजसुधारक होऊन गेले त्यांच्यापैकीच एक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होते. त्यांनी दलितांचा उद्धार आणि अस्पृश्यता निवारण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. त्यांनी अस्पृश्यांच्या हालअपेष्ठा आणि त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी 18 ऑक्टोबर 1906 रोजी मुंबई येथे डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापन केली. अस्पृश्यता निवारण करण्याचे कार्य आयुष्यभर करेन असा निश्चय केल्यानंतर आणि भिंगारच्या कार्यक्रमानंतर ते मुंबईला गेले. त्याठिकाणी त्यांनी प्रार्थना समाजाचे पदाधिकारी व आपल्या सहकाऱ्यांबरोबर अस्पृश्यता निवारण करण्यावर सविस्तर चर्चा केली. त्यांच्या प्रयत्नामुळे प्रार्थना समाजानेसुद्धा अस्पृश्यता निर्मूलनासाठी व अस्पृश्यांच्या उद्धरासाठी कार्य केले. मुंबई येथील एफ्लिन्स्टन रोड येथे डिप्रेस्ड क्लासची पहिली शाळा स्थापन करण्यात आली. डिप्रेस्ड क्लास मिशनच्या माध्यमातून प्राथमिक व दुय्यम शाळा, वसतिगृहे, मोफत दवाखाने, उद्योग, इतर शाळा इत्यादी काम सुरू झाले. ज्ञानवर्धक माहितीपूर्ण लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांत जरूर वाचा.... संपादक.*

मिशनच्या कार्याचा व्याप वाढल्यामुळे विठ्ठल रामजी शिंदे यांना कार्यकर्त्यांची आवश्यकता भासू लागली. त्यांनी अस्पृश्यता निवारण कार्यात तळमळ असणारे कार्यकर्ते शोधण्यास सुरुवात केली. ही सुरुवात त्यांनी आपल्या घरापासूनच केली. त्यांची बहीण पनवेल येथे मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिका होती. त्यांच्या बहिणीने नोकरीचा राजीनामा देऊन मिशनचे कार्य करण्यास सुरु केले. त्यांचे आई–वडीलही जमखंडी सोडून मुंबईला आले. त्यांनी आपल्या मुलांनी सुरु केलेल्या कार्यात भाग घेऊन अस्पृश्यता निवारण व दलितांच्या उद्धाराचे काम सुरु केले. त्यांच्या प्रयत्नामुळे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्याची व्याप्ती वाढू लागली होती. महाराष्ट्राच्या बाहेरील प्रांतातही मिशनच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. दि.18 ऑक्टोबर 1909 रोजी डिप्रेस्ड क्लास मिशनचा तिसरा वर्धापन दिन मुंबईला टाऊन हॉलमध्ये साजरा करण्यात आला. यावेळी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, सर नारायण चंदावरकर आणि गोपाळ कृष्ण गोखले आदी मान्यवर उपस्थित होते. याचवेळी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनला दोन हजार रुपये देणगी जाहीर केली होती.

डिप्रेस्ड क्लास मिशनची शाळा व वसतिगृहे–

मिशनने अनेक शाळा आणि वसतिगृहे सुरु केली होती. इ.स.1912मध्ये विठ्ठल रामजी शिंदे कायम वास्तव्यासाठी पुणे येथे आले. पुणे येथे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या चौदा ठिकाणी 23 शाळा, 5 वसतिगृहे आणि 12 इतर संस्था होत्या. मिशनचे पाच प्रचारक आणि शाळेत 55 शिक्षक होते. पुणे शाखेचा



अहवाल पाहून तुकोजी महाराज होळकरांनी महर्षी शिंदेंना वीस हजार रुपये देणगी दिली. पुणे येथील सात एकर जमीन पुणे नगर परिषदेने 99 वर्षाच्या कराराने मिशनच्या स्वाधीन केली. या जागेच्या आसपास त्या काळात अस्पृश्य समाजाची भोकरवाडी नावाची वस्ती होती. यथे इ.स.1922मध्ये भव्य इमारत बांधण्यात आली. या इमारतीचे नाव अहिल्या आश्रम असे ठेवण्यात आले. त्यांचे यश आणि त्यांनी सुरु केलेले सामाजिक कार्य काही लोकांना सहन झाले नाही. या लोकांनी अगदी खालच्या पातळीला जाऊन त्यांच्यावर आरोप केले. त्यांच्यावर चिखल फेकण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे इ.स.1923मध्ये त्यांनी कंटाळून डिप्रेस्ड क्लास मिशनचे दायित्व ते ज्या समाजासाठी कार्य करीत होते त्यांच्याकडे सोपवून मिशनच्या कार्यातून मुक्त झाले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म दि.23 एप्रिल 1873 रोजी कर्नाटक राज्यातील जमखंडी येथे झाला. त्यांचे वडील रामजी व आई यमुना हे कानडी भाषिक असून ते वारकरी पंथाचे होते. त्यांचा परिवार जमखंडी गावात प्रतिष्ठित होता, पण आर्थिकदृष्ट्या संपन्न नव्हता. साधारण आर्थिक परिस्थिती असणाऱ्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्याकाळी बालविवाहाची प्रथा प्रचलित होती. या प्रथेनुसार विठ्ठल शिंदे यांचे लग्न वयाच्या 9व्या वर्षी रुक्मिणी नावाच्या मुलीशी झाले. आई–वडील वारकरी असल्यामुळे त्यांच्यावर लहानपणापासून वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले होते. त्यामुळे तेसुद्धा लहानपणापासून वारकरी संप्रदायाच्या भक्तिमार्गामध्ये रमले गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जमखंडी येथे पूर्ण झाले. वयाच्या 12व्या वर्षी इ.स.1885मध्ये इंग्रजी हायस्कूलच्या पहिल्या वर्गात त्यांनी प्रवेश घेतला. इयत्ता दुसरीत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आणि त्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली. ही शिष्यवृत्ती मॅट्रिक होईपर्यंत चालू होती. मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर लगेच त्यांना संस्थानांच्या शाळेत शिक्षकाची नोकरी मिळाली होती. परंतु पुढे आणखी शिक्षण घ्यावे अशी त्यांची इच्छा असल्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. पुढे विठ्ठल रामजी शिंदे यांनी गंगाराम मस्के यांच्या मदतीने पुणे येथे फर्ग्यूसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. फर्ग्यूसन कॉलेजमध्ये त्यांना दर महिन्याला दहा रुपये शिष्यवृत्ती मिळत होती. या शिष्यवृत्तीत शैक्षणिक खर्च भगिवणे त्यांना कठीण जात होते. पण तश्याही स्थितीत त्यांनी शिक्षण सोडले नाही. त्यांचा मित्र विष्णुपंत देशपांडे यांच्या मदतीमुळे ते पहिल्या वर्षाची परीक्षा देऊ शकले. इ.स. 1893– 1898 या काळात विठ्ठल रामजी शिंदे यांनी फर्ग्यूसन कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. इंटर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संस्थानात नोकरी करण्याच्या अटीवर बडोद्याच्या महाराज सयाजीराव गायकवाड यांनी विठ्ठल रामजी शिंदे यांना दरमहा 25 रुपये शिष्यवृत्ती दिली होती.

डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटी या संस्थेची सर्वप्रथम स्थापना दि.14 जून 1928 रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृशांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी केली होती. डिप्रेस्ड क्लासेसमधील उच्च शालेय विद्यार्थ्यांचा विशेष लाभ घेण्यासाठी मुंबई सरकारने पनवेल, ठाणे, नाशिक, पुणे आणि धारवाड येथील पाच वसतिगृहाची जागा मंजूर केली. ‡दलितांचा उद्धार हाच आमचा ध्यास‡ या ध्येयाने पुण्यातील नाना पेठ येथील दी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडियाची 117 वर्षे वाटचाल सुरू आहे. शोषित, पीडित आणि दलितांच्या विकासाचे ध्येय ठेवून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दि.18 ऑक्टोबर 1906 रोजी या संस्थेची स्थापना करून पुनरुज्जीवन केले होते. सुरुवातीला मुंबई आणि पुणे या दोन्ही ठिकाणांहून संस्थेचे कामकाज सुरू होते. मात्र 1908मध्ये महर्षी शिंदे यांनी पुण्यात संस्थेचे मुख्यालय असेल, असा निर्णय घेतला. हे येथे उल्लेखनीय!

!! डिप्रेस्ड क्लास मिशन स्थापना दिनाच्या मागासवर्गीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड नं–20, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्स ?प–9423714883.**

# आर जी देशमुख कृषी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन संपन्न




वाठोडा (प्रतिनिधी कॅलिफोर्निया टाईम्स)- भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न मिसाईल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून आर.जी.देशमुख कृषी विद्यालय वाठोडा येथे नुकतीच संपन्न झाली.माझा जन्मदिवस हा विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात यावा अशी इच्छा भारताचे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या इच्छेनुसारच वाठोडा येथील वर्ग पाच ते दहा च्या विद्यार्थ्यांनी विविध विषयाच्या पुस्तकातील उतारूयाचे वाचन करून वाचन प्रेरणा दिन साजरा केला. विद्यार्थ्यांनी इंग्रजी, मराठी व हिंदी या तिन्ही भाषेतील पाठ्यपुस्तके व इतर अवांतर वाचनाची पुस्तके यातील उतारे वाचून वाचन प्रेरणा दिन संपन्न केला . उत्कृष्ट वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य अजय देशपांडे होते, तर पर्यवेक्षक एस एन राऊत, कलाशिक्षक एस पी काळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन वर्गशिक्षिका एस के देशमुख मॅडम यांनी केले. वर्ग नऊ मधील विद्यार्थिनी गुरुक्षा..... व रसिका गोहत्रे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन केले. तसेच या विद्यार्थिनींनी उपस्थितांचे आभार मानले. वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# फडणवीसांच्या गळाला लागलेला 'तो' मोहरा पुन्हा शरद पवारांकडे, BJP सोडण्यापूर्वी दादांवर गंभीर आरोप

**मुंबई**:- राज्यात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. निवडणुकांची चाहूल लागताच सुरु झालेल्या पक्षांतरांनी आता वेग घेतला आहे. अशातच आता, माजी मंत्री आणि मोहोळ विधानसभा मतदारसंघातून इच्छुक असलेले लक्ष्मण ढोबळे यांनी भाजपला रामराम ठोकत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. यावेळी त्यांनी महायुतीत नव्याने सामील झालेल्या अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.



पक्षांतरणाचा निर्णय- लक्ष्मण ढोबळे गेल्या काही दिवसांपासून भाजपमध्ये असमाधानी असल्याच्या चर्चा होत्या. ते पक्षांतराच्या विचारात असल्याचेही राजकीय वर्तुळात बोलले जात होते. दोन दिवसांपूर्वीच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांची भेट घेतली होती. अशातच आज, भाजपमध्ये आपल्याला डावललं जात असल्याने आपण पक्षांतराचा निर्णय घेत असल्याचे ढोबळे यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे भाजपला सोलापूर जिल्ह्यात मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.




## हाय व्होल्टेज ..

सुपर हाय व्होल्टेज
अहंकाराला झटका
पुन्हा नव्यांनी उमेद
आळससारा झटका

निवडणूकी बसला
भला मोठा फटका
फाडून टाके इज्जत
माणूस एक फटका

बदलून टाके गणित
मतदारहाती खटका
आरंभीच्याउत्सवात
मोजा अंतिम घटका

विश्वासाचा निःश्वास
उलटाफुटला मटका
इलेक्शन नाही मुळी
लॉटरी जुगार मटका

थंडपणा पार नडला
बसला कसा चटका
रे परिस्थिती सांगते
कधी विनोदी चुटका

विचीत्र दिसे प्रतिमा
जुडताआरसा तुटका
सावरून जाईल घडी
चहाचाकपही फुटका

कधी जनता जनार्दन
संताप दाखवे लटका
संभ्रम अजूनही तसा
संशयाचेधुके दाट का

**- हेमंत मुसरीफपुणे**
**9730306996..**
**www.kavyakusum.com**

## नाती ..

कार्यकर्त्यांची गर्दी
नेहमी मज भोवती
असो मीठ भाकरी
एकाताटात जेवती

एक हाक मारताचं
शेकडोपाय धावती
वन बी एच के मध्ये
गर्दीअलगद मावती

आजार कुणाचेघरी
कधी भिती नव्हती
आधी मनुष्य मोठा
ती नंतर जातीपाती


कधी अपयश लाभे
मीचं चुकलोम्हणती
सर्वत्र दोस्तचं दोस्त
कशी करावी गणती

यश मिळता कधीही
पेढास्वताचं भरवती
बसवून घे खांद्यावर
गावात सुखे मिरवती

सगे सोयरे हे सोबती
मागे कार्यकर्ताशक्ती
फर्म बाकीचा कोरा
इतकीचं मज संपत्ती

येणारं जाणारं सत्ता
काही न माझ्या हाती
इतकी सुबुद्धी मिळो
अतूट ठेवायची नाती

**- हेमंत मुसरीफपुणे**
**9730306996.**
**www.kavyakusum.com**






# दुर्गा विसर्जन दरम्यान मिरवणूकीवर खर्च न करता रुग्णाला आर्थिक मदत

## आनंद सांस्कृतिक दुर्गा मंडळाचे स्तुत्य उपक्रम



**वरूड :कॅलिफोर्निया टाईम्स**–शहरातील दुर्गा विसर्जन मिरवणूकीवर यावर्षी कुठलाही अनठाई खर्च न करता विसर्जन मिरवणूकीवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची रोख रक्कम एका रुग्नाला आर्थिक मदत म्हणून दिल्याने आनंद सांस्कृतिक दुर्गा मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वच क्षेत्रातुन अभिनंदन केल्याजात आहे.


हलाकीच्या परस्थितीत एखादयाला मोठा आजार जडला तर त्या कुटुंबीयांचे जिवन उद्धस्त होण्यास वेळ लागत नाही. आणि अश्यावेळी जर एखाद्याने सामाजिक दायित्व म्हणून आर्थिक मदत केली तर तो व्यक्ती,संघटना, गणेश मंडळ असो किंवा दुर्गा मंडळ त्या रुग्णाकरीता देवदुत ठरतो. अशीच परिस्थिती शहरातील एका रुग्णावर ओठावल्याने त्या रुग्णाच्या आईने मुलाच्या उपचाराकरीता स्वत:चे टिना मातीचे घर विक्रीस काढले होते. हिबाब आनंद सांस्कृतिक दुर्गा मंडळाचे दिपक खंडेलवाल आणि मनोज गुल्हाणे यांना कळताच त्यांनी मंडळाच्या सदस्यांसमोर हा प्रस्ताव ठेवला असता सर्वच सदस्यांनी एक मुखाने मान्यता दिली. यामुळे दुर्गा विसर्जन मिरवणूकीवर कुठलाच अनाठाई खर्च न करता त्या रुग्णाला आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि कुठलेही वादय लाउडस्पिकर न वाजवता थेट शेकदरी प्रकल्पावर नेवुन दुर्गा मातेचे अत्यंत शांततेच विसर्जन केले. आणी आपले सामाजीक दायीत्व म्हणुन आनंद सांस्कृतिक दुर्गा मंडळाने त्या रुग्णाच्या आईकडे मंडळात शिल्लक राहलेल्या संपूर्ण रोख रक्कमेचा धनादेश सुपुर्द करीत समाजला एक चांगला संदेश देण्याचा प्रयत्न केला. या स्तुत्य उपक्रमाकरीता आनंद सांस्कृतिक दुर्गा मंडळाचे अध्यक्ष किशोर गुल्हाणे, दिपक खंडेलवाल, मनोज गुल्हाणे, शैलेश खंडेलवाल, धिरज गुल्हाणे, अनिल गुल्हाणे, लोकेश अग्रवाल, डॉ. प्रविण चौधरी, जितेंद शहा, विकास वागद्रे, राजेश खंडेलवाल, लोकेश गुल्हाणे, हरीष कानुगो, राजेश गुल्हाणे, जितेंद्र देवघरे, हर्षल गुल्हाणे, अभिषेक खंडेलवाल, अजय गुल्हाणे, आलोक खंडेलवाल, निरज गुल्हाणे, संजय कानुगो, डॉ. संदीप बेहरे, सागर श्रीराव, राजेंद्र खंडेलवाल, सचिन गुल्हाणे, अमोल गुर्जर, आलोक खंडेलवाल, नितीन गुल्हाणे, अशोक खेरडे, अमित खंडेलवाल, कमलाकर देशमुख, राहुल लोखंडे, प्रविण गुल्हाणे, तुषार मानकर, राकेश खंडेलवाल, भगवंत पोफळे, श्याम बिजवे, राहुल गुल्हाणे, पुरुषोत्तम सुरजुसे, राम खंडेलवाल, भुषण नेरकर, रविकांत खंडेलवाल, योगेश गुर्जर, प्रदिप पटेल, गजानन शिरभाते, राहुल कानुगो, ललीत गुल्हाणे, अंकुश गुल्हाणे, प्रमोद फुटाणे यांचे सहकार्य लाभले. आनंद सांस्कृतिक दुर्गा मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वच क्षेत्रातुन अभिनंदन केल्याजात आहे.

# राष्ट्रसंताची ग्रामगीता व आंबेडकराचे संविधान जनतेची आचारसंहिता!प्रा.गंगांधर दंवडे ?



**श्रीक्षेत्र वरखेड**- 11आक्टोबंर वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी जीवनभर ग्रामगीतेच्या माध्यमातून संपूर्ण विश्वाला मानवतेचा संदेश देवून आपले कसे सुखी संपन्न होण्यासाठी आदर्श ग्राम निर्माणाची संकल्पना दिली असून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या रूपाने आपली आपल्या देशाप्रती जबाबदारी, अधिकार आणि कर्तव्ये सांगितले आहे आणि हिच आपल्या सर्वांची आचारसंहिता असल्याचे प्रतिपादन माणिकलाल गांधी जागृत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.गंगाधर दंवडे यांनी काढले.ते तारखेप्रमाणे वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या 56व्या पुण्यतिथी आयोजित राष्ट्रसंत व्याख्यानमालाकार्यक्रमाचे प्रसंगी बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजभूषण डॉ.निळकंठ यावलकर हे होते.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री माणिक वाचनालयाचे सचिव व संत साहित्याचे अभ्यासक माणिकदादा बेलूरकर यांनी केले.यावेळी राष्ट्रीय नकलाकार हरिभाऊजी बेलूरकर,प्रा.अरविंद वानखेडे,इत्तमगाव, युवा कार्यकर्ते श्री सागर भोवते यांनी ही वंदनीय राष्ट्रसंतांच्या जीवनावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री गुरूदेव सेवा मंडळाचे प्रचारक दिलीप मोहेकर यांनी आभार सौ.वंदना बाळू हरणे यांनी केले तर याप्रसंगी आयोजित चर्चासत्रात श्री सतिस मनगटे, सुभाष धुर्वे, दादा धर्मपाल मेश्राम, अनिल बेलूरकर, चंपतराव सोनटक्के,सागर भोवते सौ.ल्युबाताई निळकंठराव यावलकर या सारख्या शेकडो कार्यकर्ते व महिला भगिनींनी सहभाग नोंदवला वंदनीय राष्ट्रसंताच्या राष्ट्रवंदनेव्दारे कार्यक्रमाची सांगता झाली.

# 19 नोव्हेंबरला अमरावतीला स्पर्धा परीक्षा कार्यशाळा एमपीएससी टॉपर अभिषेक कासोदे यांचे मार्गदर्शन



**अमरावती :कॅलिफोर्निया टाईम्स**- अमरावती जिल्हा परिषदेच्या कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी व संपूर्ण भारतातून दहाव्या क्रमांकाचे आयएएस झालेल्या श्रीमती संगीता महापात्र यांच्या पुढाकाराने येत्या शनिवार दिनांक 19 नोव्हेंबरला सकाळी 11 वाजता अमरावती जिल्हा परिषदेच्या डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहामध्ये एका विनामूल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेला कुठल्याही प्रकारचे शुल्क नसून सर्व प्रकारचे विद्यार्थी या कार्यशाळेला उपस्थित राहू शकतात. या कार्यशाळेला एमपीएससी टॉपर व सध्या अमरावती विभागात तिवसा येथा बिडिओ म्हणून कार्यरत असणारे श्री अभिषेक कासोदे चाळीसगाव हे मुख्य मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना संबोधित करणार आहेत. अमरावती जिल्ह्यातील मुले जास्तीत जास्त संख्येने स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी व्हावेत यासाठी श्रीमती संजीता महापात्र यांनी या विनामूल्य उपक्रमाचे आयोजन केले आहे.यापूर्वी झालेल्या स्पर्धा परीक्षा कार्यशाळेत यावर्षी आयएएस झालेले श्री अमर राऊत सातारा यांनी विद्यार्थ्यांना दोन तास मार्गदर्शन केले होते. स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थी तयार व्हावेत यासाठी स्वत: मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संजीता महापात्र या स्वत: वेगवेगळ्या संस्थेमध्ये शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा बाबत मार्गदर्शन करीत आहेत. या पूर्वी अमरावतीचे जिल्हाधिकारी श्री किरण गीते यांनी अशाच प्रकारचा उपक्रम अमरावतीच्या डॉक्टर पंजाबराव देशमुख आयएस अकादमीच्या मिशन आयएएस या उपक्रमा अंतर्गत चालविला होता. त्यानंतर या उपक्रमामध्ये खंड पडला होता .परंतु नवीन आलेल्या श्रीमती संजीता महापात्र यांनी पुढाकार घेऊन या उपक्रमाचे आयोजन केले आहे .दर महिन्याला दोन विनामूल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळा होणार असून यामध्ये वरिष्ठ आयएएस व एमपीएससी उत्तीर्ण झालेले अधिकारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत .तसेच त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पण देणार आहेत .तरी स्पर्धा परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या व बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी या विनामूल्य स्पर्धा परीक्षेचा लाभ घ्यावा असे विनंती संयोजकातर्फे करण्यात आली आहे .

# शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल भुयार यांनाच दोघांच्या भांडणात लागू शकतात शिवसेना शिंदे गटाची लॉटरी....



**वरुड:कॅलिफोर्निया टाईम्स** –येत्या 22 तारखेपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची वेळ आलेली असून अजून पर्यंत कुठल्याच पक्षाची उमेदवारी जाहीर झालेली सून. महायुतीमध्ये मात्र सध्या घमासान सुरू असून वरूड मोर्शी मतदार संघाचा पेच ाढलेला असून वरूड मोर्शी विधानसभेचा निर्णय हा अमित शहा यांच्या पारड्यात दिल्लीत गेलेला असून वरूड मोर्शी विधानसभा मतदारसंघ हा अजित पवार गट आणि ाजपा दोघांना न सोडता वरूड मोर्शी विधानसभा शिवसेना शिंदे गटाला सोडण्याच्या यारीत असून शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी या जागेवर दावा केलेला असून ते वरूड मोर्शी विधानसभेकरिता आग्रही आहेत. शिवसेना शिंदे गटाचे मेदवार तळागाळातून पुढे आलेला शिवसैनिक शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल ुयार हे मैदान लढवण्याकरिता तयार आहेत. अजून मात्र अंतिम निर्णय झालेला सून. शिवसेनेचे दोन तुकडे पडल्यानंतर वरूड मोर्शी विधानसभेमध्ये शिवसेना पजिल्हाप्रमुख अमोल भुयारच्या माध्यमातून शिवसेना शिंदे गटाला वरूड मोर्शी विधानसभेत खूप मोठी उभारी मिळाली.शिवसेना पक्षाने वरूड मोर्शी विधानसभा मतदारसंघात गावागावात शिवसेनेची पकड मजबूत केली. आणि नवीन तरुण तडफदार स्थानिक युवा चेहऱ्यालाच हा मतदारसंघ संधी देतो. आणि वरूड मोर्शी हा शिवसेनेचा ाड असून अमोल भुयार हेच विधानसभेवर भगवा फडकवण्याच्या तयारीत असून यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल भुयार च महायुतीचे सक्षम उमेदवार असू शकतात. आणि शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल ुयार यांनी दोघांच्या भांडणात वरूड मोर्शी विधानसभेची महायुतीची उमेदवारी मलाच मळेल. असे यावेळी सांगितले.

# सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेले शेकदरी धरणावर दुर्गा देवी विसर्जन



**वरुड:कॅलिफोर्निया टाईम्स**–वरुड तालुक्यातील शहरी व ग्रामीण अनेक गावातील दुर्गा देवी मंडळ विसर्जनासाठी शेकदरी धरणावर दरवर्षी प्रमाणे यावर्षी पोलीस बंदोबस्त व विशेष शामीयाना टाकुन व लाऊडस्पीकर ची जाग्यावर व्यवस्था करुन प्रत्येक मंडळावर लक्ष ठेऊन त्यांना मार्गदर्शन करत शांततेत देवी विसर्जनात खुप मोलाचे कार्य यावेळी पाहायला मिळाले.व प्रत्येक मंडळाचे देवी विसर्जन झाल्यावर आभार व अभिनंदन सुध्दा या वेळेस पाहायला मिळाले.यावेळेस जरुड चौकी येथिल कर्तव्यदक्ष बिट जमादार श्री.सुनिल आकोलकर, पोलीस अमलदार श्री.निलेश भुयार,सौनिक श्री.यशपाल पवार याचे सर्व मंडळातर्फे मनोजदादा माहुलकर( पाटील) ग्राम पंचायत सदस्य,टेंभुरखेडा व शासनाचा शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शशीभुषन उमेकर यांनी तुमच्या कार्याला सलाम करत आभार मानले.व विशेष यावेळी श्री.प्रविन वसुले बिछायत केंद्र जरुड यांनी बिनामुल्य साउंड व शामीयाना दिल्या बद्दल जरुड चौकी तर्फे वसुले यांचे आभार व अभिनंदन केले..

# परम पुज्य महन्त स्वामी श्री वासुदेवानंद गीरी महाराज यांची आध्यात्मिक आघाडीच्या जिल्हा संयोजक म्हणुन नियुक्ती



**वरुड:कॅलिफोर्निया टाईम्स**–परम पुज्य महन्त स्वामी श्री वासुदेवानंद गीरी महाराज यांची आध्यात्मिक आघाडीच्या जिल्हा संयोजक म्हणुन नियुक्ती खासदार डॉ अनिल बोंडे यांनी केली आहे.परम पुज्य महन्त स्वामी श्री वासुदेवानंद गीरी महाराज कैलास आश्रम शिवमंदिर कुरळी ता.वरुड जी.अमरावती इथे कार्यरत आहे धर्मसेवा,जनसेवा,आध्यात्म सेवेत ते सद ?व झटत असतात त्यामुळे त्यांची जिल्हा संयोजक म्हणुन सर्वानुमते नियुक्ती करण्यात आलीत्यांच्या नियुक्तीबद्दक त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे गायत्री परिवार,पतंजलि परिवार,तसेच संत अच्युत महाराज जन्मभुमि संस्थान ने त्यांच्या नियुक्तीचे स्वागत केले आहे




‘KirantaiBabaraoMeghe Education Society’
(REGD NO.MAH/463/17/F-19460)

**ORANGE CITY INSTITUTE OF NURSING (B.Sc Nursing)**

Near Railway Line Nagpur Road,Roshankheda, WarudTq. WarudDist.Amravati
**Ph.No** : 07229 297980
**Contact** : 8010500968 , 9673575964
**Email**-orangecityinstituteofnursing@gmail.com
**Website**-https://www.orangecityinstituteofnursing.com

**ADMISSION OPEN**
**B.Sc Nursing**
**2024-25**
(For Institutional Level Quota)

(**No. MED-1024/C.R.No.81/B.Sc.Nursing/CAP-5 & Insti.Round/1706 Date: 25/09/2024)** With reference to above notification of **Govt. of aharashtra. Govt. of State CET cell Mumbai**, application are invited from eligible& interested candidates for admission to 1st year B.Sc Nursing for institute level Quota for Academic Year 2024-25.
The eligible **(MH Nursing-CET Appeared)** desirous candidate must apply in person/any person to respective college in prescribe format from **18/10/2024 to 21/10/2024 up to 05.30 pm.**

**The last date of Admission is 31/10/2024 at 5 pm**

**Principal**
Orange City Institute Of Nursing

**थेटभेट-बेनोडा ( शहिद ) कॅलिफोर्निया टाईम्स- बेनोडा ( शहिद )येथे राष्ट्रसंत श्री.तुकडोजी महाराज पालखी खांद्यावर घेऊन मार्गक्रमण करतांना भाजपच्या नेत्या अर्चना मुरुमकर व भाजप नेते अमित कुबडे- कॅलिफोर्निया टाईम्स**

